**बाबा**

मौन घराच्या भिंती
जुन्या जाणत्या ओल्या
परक्या क्षणात झाल्या
बाबाने सावरलेल्या
कितीक उन्हाचे चटके
सोसून पोपडे चढले
रंग चिकटला तेव्हा
बाबाचे वय झालेले
मी जोडत तुकडे तुकडे
छप्पर सांधत बसले
बाबाच्या अस्तित्वाचे
आभाळ मला गवसले
तो प्रकाश चिरकालाचा
देऊन तृप्त होताना
मी त्यास पहिले होते
दूर दूर जाताना

**संध्या रानडे**